# *एक मंदिर. . .*

# *प्रस्तावना*

## ~ गुरुमाई चिद्विलासानंद

गुरुवार, १० जुलै २०२५रोजी शुभ गुरुपौर्णिमेच्या दिवशी सकाळी, मी आश्रमाच्या बागेमध्ये काही मिनिटे शांत बसून त्या दिवसाच्या मांगल्याविषयी विचार करत होते. मी विचार केला की, शतकानुशतके मानवजात किती श्रद्धेने या दिवसाच्या पावित्र्याचा आदर करत आली आहे—असे केवळ यामुळे आहे की, फार पूर्वी एकदा शिष्यांनी त्यांच्या श्रीगुरूंना प्रश्न विचारला आणि श्रीगुरूंनी त्यांना उत्तर दिले. [महर्षी वेदव्यास आणि गुरुपौर्णिमेच्या आरंभाची कथा वाचा.]

मी जेव्हा गुरू आणि शिष्य यांच्यातील या सर्वात रूपांतरणकारी संबंधाविषयी विचार करत होते, तेव्हा सिद्धयोगींनी गुरुपौर्णिमेच्या त्यांच्या अनुभवांबद्दल अलीकडेच जे सांगितले आहे, ते वाचण्याची इच्छा मला झाली. म्हणून, मी सिद्धयोग मार्गाची वेबसाइट पाहिली. तिथे स्वामी इंदिरानंदांनी गुरुपौर्णिमेप्रीत्यर्थ दक्षिणा अर्पण करण्यासाठी लिहिलेले जे आमंत्रणपत्र होते, त्याच्या खाली फ्लोरिडातील एका सिद्धयोगीने पाठवलेला एक अनुभव होता, जो मी वाचला. या सहृदय सिद्धयोगीने लिहिले होते :

> मला दक्षिणेचा अभ्यास अतिशय प्रिय आहे. या दिव्य अभ्यासाद्वारे, माझे जीवन पूर्णपणे रूपांतरित झाले आहे आणि बनले आहे एक मंदिर कृपेचे. दक्षिणा या अभ्यासाने मला देणे व प्राप्त करणे याच्या एका अद्‌भुत चक्रात ओढून घेतले आहे, ज्याद्वारे मला अशी अनुभूती होते की, माझ्या श्रीगुरू सदैव माझ्यासोबत आहेत—त्या मला सतत शिकवत आहेत, मला मार्गदर्शन करत आहेत, माझे रक्षण करत आहेत आणि मला दिव्य प्रेमाने ओतप्रोत करत आहेत.

*एक मंदिर कृपेचे,* हे शब्द जेव्हा मी वाचले, तेव्हा मला असे वाटले की, काळ जणूकाही थांबला आहे. आता, कदाचित तुम्ही विचार करत असाल, “गुरुमाई, *एक मंदिर कृपेचे* हे शब्द तुम्ही पहिल्यांदाच वाचले किंवा ऐकले आहेत का आणि म्हणून तुम्ही त्यांच्या शक्तीने इतक्या प्रभावित झालात का?” माझे उत्तर आहे, “खरे तर नाही.” याच कारणास्तव, वेळ-प्रसंगाचे महत्त्व असते, स्थानाचे महत्त्व असते,

व्यक्तीचे महत्त्व असते, तुमच्या नशिबाचे महत्त्व असते, तुमच्या कर्मफळांचे महत्त्व असते. प्रत्येक प्रसंगाची स्वतःची अशी शक्ती असते.

गोष्ट अशी आहे की, ती गुरुपौर्णिमेच्या महोत्सवाची सकाळ होती. त्या दिवशी सकाळी थोड्या वेळानंतर मी भगवान नित्यानंद मंदिरात सत्संग करणार होते. मी महर्षी वेदव्यासांच्या कथेवर चिंतनमनन करत होते. मी चिंतन करत होते की, बाबा मुक्तानंदांनी कितीतरी प्रकारे हजारो जिज्ञासूंच्या जीवनावर प्रभाव पाडला होता. मी माझ्या त्या सर्व आशीर्वादांचे स्मरण करत होते, ज्यायोगे मी आशीर्वादांनी पूरित असे जीवन जगते आहे.

कृतज्ञतेची अनुभूती करवून देणाऱ्या त्या सुवर्णक्षणांमध्ये मी निमग्न असताना *एक मंदिर कृपेचे* हे शब्द माझ्या वाचनात आले. असे वाटले की, जणूकाही संपूर्ण सृष्टीने ते उच्चारले आणि मी ते ऐकले. असे वाटले की, जणूकाही संपूर्ण सृष्टीमध्ये एखादी हालचाल झाली आहे आणि मला ती जाणवली. असे वाटले की, जणूकाही सृष्टीला जे माहीत होते त्याविषयीची मला जाणीव होती. एक मंदिर कृपेचे, होय. आपण कृपेच्या मंदिरात राहतो. आपण जिथे कुठे उभे राहतो, आपण जिथे कुठे बसतो, आपण जिथे कुठे ध्यान करतो, आपण जिथे कुठे चालतो, बोलतो आणि काम करतो, अगदी तिथेच ते प्रकट होते.

मला या मंदिराचा एक विलक्षण अनुभव येत होता आणि मला माझ्या मनात **एक मंदिर...** हे शब्द ऐकू येत होते, तेव्हा अचानक, मला *प्रकाश* दिसला. मी मनातल्या मनात म्हणाले, "एक मंदिर प्रकाशाचे. प्रकाश. *प्रकाश.* किती सुंदर शब्द आहे—*प्रकाश!* कृपेचा प्रकाश माझ्यावर अवतरित झाला आहे! मी प्रकाश आहे."

मी जेव्हा या बोधासमवेत होते, तेव्हा प्रकाशाविषयी *[प्रकाशाला इंग्रजीत 'लाइट' म्हणतात]* आणि त्याच्याशी निगडित असलेले आणखी काही विचार माझ्या अंतरी उद्‌भवले. माझ्या मनात प्रसन्नचित्ततेचा विचार आला *[प्रसन्नचित्ततेला इंग्रजीत 'लाइटहार्टेडनेस' म्हणतात]*. लवचिकता. हलकेपणा जाणवणे ज्याचा अर्थ फार ओझे न बाळगणे असादेखील आहे. *[इंग्रजीत याला 'बीईंग लाइट' म्हणतात, जिथे लाइट म्हणजे प्रकाशदेखील आहे आणि हलकेपणादेखील आहे].* तर, मी प्रकाशाच्या एका मंदिरात होते.

*एक मंदिर कृपेचे,* या वाक्यांशाने माझ्या अंतरी जे-जे उद्‌भवत गेले, त्याविषयी मी खूप काही सांगू शकते. तथापि, वर्ष २०२५साठी माझा संदेश, *तुमचा वेळ हा तुमच्यासाठी लाभप्रद बनवा,* हा असल्यामुळे मी माझ्या अनुभवाचे वर्णन इथेच थांबवते आणि बडे बाबांच्या मंदिरात सत्संगादरम्यान जे घडले, ते सांगते.

मी ठरवले की, सत्संगात मी सिद्धयोगींना विचारेन की, ते हा वाक्यांश पूर्ण कसा करतील—
**एक मंदिर....** कोणते संकल्प ते साकार करू इच्छितात? माझी अशी इच्छा होती की, प्रत्येकाने स्वतःच्या जीवनाची कल्पना एका मंदिराच्या रूपात करावी—आणि एका अशा मंदिराच्या रूपात करावी जे त्या सद्‌गुणाने संपन्न आहे, जो त्या क्षणी त्या व्यक्तीसाठी अर्थपूर्ण आहे.

म्हणून, सत्संगाच्या सुरुवातीला मी सत्संगात सहभागी झालेल्या एका व्यक्तीला सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरील तो अनुभव वाचण्यास सांगितले, जो मला इतका प्रेरणादायी वाटला होता. त्या व्यक्तीने तो अनुभव अतिशय सुंदर रितीने मोठ्याने वाचला आणि मग मी, त्या दिवशी सकाळी मला आलेल्या अनुभवाबद्दल सर्वांना सांगितले. मग सहभागी झालेल्या लोकांना मी सांगितले की, *त्यांना* कोणत्या प्रकारचे मंदिर निर्माण करायचे आहे व अनुभवायचे आहे, ते त्यांनी इतरांना सांगावे.

अनेक लोक आपल्या श्रीगुरूंच्या आज्ञेचे पालन करण्यास उत्सुक होते. त्या शिष्यांनी लगेचच त्यांच्या कल्पना सांगितल्या की, ते स्वतःसाठी कशा प्रकारचे मंदिर निर्माण करतील. ते दृश्य पाहणे किती सुंदर होते! प्रत्येकाच्या हृदयातून व्यक्त होणाऱ्या विचारांनी व अनुभवांनी वेढलेले असणे, हे अतिशय मधुर होते—गुरुपौर्णिमेच्या दिवशी बडे बाबांच्या मंदिरात बसणे, सत्संगाच्या स्पंदनांमध्ये, बडे बाबांच्या सान्निध्यात, सिद्धयोगाच्या शिष्यांसमवेत बसणे. तुम्ही त्याला *जादुई* म्हणू शकता. निश्चितच, ते कृपेने पूरित होते.

**एक मंदिर...**च्या वैभवाची अनुभूती झालेल्या त्या दुसऱ्या लाटेनंतर, मला असे जाणवले की, मी वैश्विक सिद्धयोग संघम्‌मधील प्रत्येकाला गुरुपौर्णिमेच्या या उपहारामध्ये सहभागी करू इच्छिते. म्हणून मी सत्संगातील लोकांना सांगितले की, त्यांनी या विषयावर चिंतनमनन करणे सुरू ठेवावे आणि
**एक मंदिर...** याविषयीचे त्यांचे संकल्प सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटकडे पाठवावेत. मी त्यांना शब्द दिला की, त्यांमधील काही संकल्पांची निवड करून मी ते जगभरातील प्रत्येकापर्यंत पोहोचवेन.

सत्संगात जेव्हा सर्वांनी हे ऐकले, तेव्हा प्रत्येकाचा उत्साह अगदी स्पष्टपणे जाणवत होता. आणि लवकरच, **एक मंदिर...**शी निगडित असे शंभराच्या वर संकल्प वेबसाइटला पाठवले गेले!

त्यांमधील हे वीस संकल्प आहेत, जे मी तुमच्यासाठी निवडले आहेत. **एक मंदिर...**शी निगडित असलेला तुम्ही तुमचा संकल्प निश्चितच लिहू शकता आणि तुमची इच्छा असल्यास, तुम्ही तो इतर अशा लोकांना सांगू शकता, ज्यांना तो संकल्प ऐकून लाभ होईल.

परम देवी, दिव्य शक्तीला समर्पित असा नवरात्रोत्सव साजरा करायला प्रारंभ करत असताना, आपण तिच्या उपस्थितीची अनुभूती करू या—प्रत्येक पानात, प्रत्येक दगडात, पाण्याच्या प्रत्येक थेंबात, धुळीच्या प्रत्येक कणात, अन्नाच्या प्रत्येक घासात, एका हास्यातून प्रसृत होणाऱ्या प्रत्येक किरणात, प्रत्येक गोड शब्दात, प्रत्येक दयाळू कृत्यात, दरवळणाऱ्या हवेच्या प्रत्येक झुळकेत. आपण त्या प्रत्येक गोष्टीत तिचे दर्शन करू या, जी आपल्याला आपल्या अंगभूत स्वातंत्र्याचा अनुभव प्रदान करते.

सद्‌गुरुनाथ महाराज की जय

~ गुरुमाई चिद्विलासानंद

© २०२५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.